नगरसचिव

<u>पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता</u>

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. ८**

**ऑक्टोबर २००८**

पुणे महानगरपालिकेची **मासिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दि.१७ ऑक्टोबर २००८** या दिवशी **दुपारी ४–०० (चार) वाजता श्री छत्रपती शिवाजीमहाराज सभागृहात** (मनपा सभागृहात) भरेल. सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

**प्रश्नोत्तरे**

मुंबई प्रांतिक म न पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**स्थायी समितीचे ठराव**

<u>विषय क्र. २५४</u>

संदर्भ :– १) नाईकनवरे ॲण्ड असो. यांचे विकास योजना कार्यालयाकडील आ. क्र. डी. पी. ४७६४, दि. २१/१२/२००६ ने दिलेली परचेस नोटीस.
२) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नअ/१२३७ दि. १२/२/२००७ चे पत्र.
३) स्थायी समिती ठराव क्रं.१९३१,दि.२०/२/२००७.
४) मनपा ठराव क्रं.५५२,दि.१४/३/२००७.
५) मनपा ठराव क्रं.१४६,दि.२८/९/२००७.
६) मनपा ठराव क्रं. ३७१,दि.२०/२/२००८.

–––

मा. महापालिका आयुक्त यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे विचारात घेऊन–

सन १९८७ चे मान्य विकास आराखड्यानुसार पुणे, पेठ हडपसर स.नं. २५ (पै) ही जागा ई.डब्ल्यू.एस.साठी आरक्षित आहे. मान्य विकास आराखड्यानुसार व शासन राजपत्रानुसार स.नं. २५,३०,३१ पै,३२ पै,२३१ पै हडपसर या मिळकती ई.डब्ल्यू.एस.आरक्षणात समाविष्ट असून त्यांचे एकूण क्षेत्र ८ हेक्टर १० आर इतके असून त्यापैकी स.नं. २३१ ब या मिळकतीचे क्षेत्र कमी होऊन एम–३४० नुसार निवासी विभागात समाविष्ट केलेले आहे.

हडपसर स.नं. २५ (पै) ही मिळकत ७/१२ उताऱ्यानुसार स.नं. २५ हि.नं. १ ची मिळकत श्री.तुकाराम सोपान काळे व इतर यांचे मालकीची आहे. या सर्वांनी नाईकनवरे ॲण्ड असो. यांना पॉवर ऑफ ॲटर्नी (पी.ए.एच.) दिलेली आहे. पी.ए.एच. यांनी सदर जागा संपादित करावी तसेच एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम १२६ मधील तीनपैकी कोणत्याही कलमानुसार कार्यवाही करणेस तयारी असल्याचे कळविले आहे.

सहा महिन्यांचे आत भूसंपादनाची कार्यवाही सुरु न झाल्यास सदरची मिळकत आरक्षणमुक्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब सहा महिन्यांचे आत भूसंपादनाची कार्यवाही सुरु होणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी भूसंपादन कायदा १९८४ प्रमाणे भूसंपादनाची कार्यवाही सुरु करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २००८ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १३३, दि. २३/७/२००८ चा झाला आहे.)

**विषय क्र. २५५**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/मुले/१३२५, दि. ६/३/२००७ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं.२०४६, दि.६/३/२००७.
३) मनपा ठराव क्रं.४, दि.२३/४/२००७.
४) मनपा ठराव क्रं.७९, दि.२९/६/२००७.
५) मनपा ठराव क्रं. ३७२, दि.२०/२/२००८.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे विचारात घेऊन –

मलनि:सारण खात्याकडील सन २००६-०७ चे 'क' अंदाजपत्रकातील कमी होणारी कामे व नवीन कामांच्या वर्गीकरणाचा तक्ता मा.महा.आयुक्त यांचे पत्रासोबत जोडला असून त्याप्रमाणे 'क' अंदाजपत्रकातील तरतुदीमधून र.रुपये ३९०.८० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :- सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २००८ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १३४, दि. २३/७/२००८ चा झाला आहे.)

**विषय क्र. २५६**

संदर्भ :- १) स्थायी समिती ठराव क्र. ३१४, दि. ३/६/१९९७.
२) मा.मुख्य सभा ठराव क्र. २६०, दि. २३/९/१९९७.
३) स्थायी समिती ठराव क्र. ३७२, दि. ३१/५/२००१
४) स्थायी समिती ठराव क्र. १३५६, दि. १८/१०/२००१.
५) मा.मुख्य सभा विषय क्र. ४४१, दि. २२/१०/२००१ (अमान्य).
६) स्थायी समिती ठराव क्र. २१३, दि. १४/५/२००२.
७) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/विअ/वानि/११६६, दि. ४/२/२००४ चे पत्र.
८) मा.स्थायी समिती ठराव क्र. १५५१, दि. १०/२/२००४.
९) मनपा ठराव क्र. ६७, दि. २४/५/२००४.
१०) मनपा ठराव क्र. २७३, दि. २२/१२/२००४.
११) दि. ७/३/२००८ रोजी मा.आमदार यांच्या समवेत झालेली बैठक.
१२) स्थायी समिती ठराव क्रं. ८९, दि.२२/४/२००८.
१३) मनपा ठराव क्रं. ८८, दि. ९/६/२००८.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे विचारात घेऊन –

पुणे शहरातील वाहतुक समस्या निवारणार्थ रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी कमी करणेकरीता व वाहतुक सुरक्षित व सुरळीत चालणेकरीता पूर्वीच्या अटी व शर्तीसह रस्त्यावरील पार्किंगचे दर चारचाकी वाहनांकरीता जास्तीत जास्त प्रति तास रुपये १०/- (र.रुपये दहा) व दुचाकी वाहनांकरीता जास्तीत जास्त प्रति तास र.रुपये २/- (र.रुपये दोन) याप्रमाणे आकारण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :- सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २००८ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. २१६, दि. २३/९/२००८ चा झाला आहे.)

<u>विषय क्र. २५७</u>

संदर्भ :– १) गर्व्हमेंट ऑफ इंडिया यांचे सॉलिड वेस्ट (मॅनेजमेंट व हॅन्डलिंग) रुल्स २०००.

२) महाराष्ट्र नॉन बायोडीग्रेबल गार्बेज कंट्रोल ॲक्ट २००६.

३) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.घकव्या/१००१/प्रक्र/५४६ पापु–२२ दि.५ जानेवारी २००२.

४) मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/उआ(घनकचरा व्यवस्थापन)/१३८५,दि. २५/३/२००८ चे पत्र.

५) स्थायी समिती ठराव क्र. ९००, दि. २/९/२००८.

–––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

मा.सुप्रिम कोर्ट यांच्या आदेशाप्रमाणे तसेच संदर्भाकिंत कायद्यान्वये निर्माण होणाऱ्या कचऱ्यांचे वर्गीकरण करणे आवश्यक असून कचऱ्याचे वर्गीकरण व विल्हेवाटीत कचरा गोळा करणाऱ्या अनेक संस्थांचा सहभाग महत्वाचा आहे. पुणे शहरात रोज सुमारे ३०० मे.टन इतका सुका कचरा कागद काच पत्र कष्टकरी पंचायत व इतर अनेक संघटनांच्या सुमारे ५००० पेक्षा जास्त सदस्यांमार्फत गोळा करुन पुर्नश्चक्रीकरणासाठी पाठविला जात आहे.

सबब पुणे शहरात घरोघरी वर्गीकरण केलेल्या कचऱ्याचे संकलन करणाऱ्या निवड केलेल्या सहकारी संस्थेमध्ये अशा प्रकारचे काम करणाऱ्या इतर संस्थांचा समावेश करणेबाबत खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अ) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात प्रस्तावित केलेल्या धोरणाच्या बाबीस मान्यता मिळणेस,

ब) १. पुणे शहराच्या विविध भागात घन कचरा विषयक कामकाज करणाऱ्या संस्था निवडणे

२. पुणे मनपाच्या अंदाजपत्रकातील तरतुदीतून आवश्यकतेप्रमाणे निवड केलेल्या संस्थेला गणवेश, संरक्षक हातमोजे, विमा संरक्षण इ.आवश्यक अंदाजपत्रकामध्ये तरतूद करणे व त्यानुसार वरील साहित्य व सुविधा संस्थेला पुरविणे

३. निवड केलेल्या सहकारी संस्थेला सुरवातीच्या काळात अत्यावश्यक सेवकवर्गाचे मानधन, जनजागृती मोहिम व प्रशिक्षण इ.बाबीसाठी वा वेळोवेळी करण्यात येणाऱ्या बजेट तरतुदीप्रमाणे रक्कम अदा करणे

४. निवड केलेल्या सोसायटीचे कामकाज समाधानकारक नसल्यास या संस्थेला पुणे मनपातर्फे देण्यात येणारी मदत तात्काळ थांबविणे व पर्यायी व्यवस्था करणे व याबाबतचा निर्णय घेण्याचा व प्रसंगी उदभवणाऱ्या सर्व अडचणी प्रश्नांबाबत निर्णय घेणे

५. सदरच्या धोरणाप्रमाणे पुणे शहरात अंमलबजावणी करणे

वरील अनुक्रमांक अ ते ब मध्ये नमूद केलेल्या सर्व बाबीसंदर्भात निर्णय घेण्याचे व कार्यवाही करण्याचे महापालिका आयुक्त यांना अधिकार देणेस

क) सदरचा खर्च हा घनकचरा व्यवस्थापनाच्या योग्य त्या अर्थशिर्षकामधून करणेस.

<u>विषय क्र. २५८</u>

संदर्भ :– १) मा.मुख्य सभा ठराव क्र. ३८१, दि. २१/२/२००८.

२) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/विका/अतिक्रमण/५०९, दि. ५/८/२००८ चे पत्र.

३) स्थायी समिती ठराव क्र. ९११, दि. २/९/२००८.

–––

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे महानगरपालिकेमार्फत शहरातील हॉकर्सचे पुनर्वसन, पुणे मनपा हॉकर्स धोरण २००७ नुसार करणेकरीता खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) खालील ५ ठिकाणी हॉकर्ससाठी गाळे बांधणे, सदर गाळे पात्र हॉकर्सना ३० वर्षे मुदतीचे कराराने देणेस

| अ.क्र. | इमारतीचे ठिकाण | गाळे संख्या |
|---|---|---|
| १) | बाणेर स.नं. ७७ | १३८ |
| २) | खराडी स.नं. ५ | २५० |
| ३) | वारजे स.नं. ८१ | ३६८ |
| ४) | वारजे स.नं. १२५ | ३९८ |
| ५) | कोथरुड स.नं. ७० | ४२३ |
| | **एकूण** | **१५७७** |

२) या प्रति गाळ्याच्या बांधकामापोटी येणारा खर्च रुपये १ लाखपैकी जेएनएनयुआरएम (बीएसयुपी) फंडातून रुपये २४,५००/– अनुदानापोटी देणेस

३) उर्वरित गाळ्याची रक्कम लाभार्थी हॉकर्सने महानगरपालिका जी बँक हॉकर्सना कर्जपुरवठा करणेसाठी नियुक्त करेल त्या बँकेकडून कर्जस्वरुपात उपलब्ध करुन देणेस.

४) गाळेधारक हॉकर्सकडून पुणे महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली सन २००८ नुसार चालू बाजारभावाप्रमाणे वार्षिक भाडे आकारणेस.

**<u>विषय क्र. २५९</u>**

संदर्भ :– १) जनेराशपुअकडील पत्र जा.क्र. मआ/जेएनएनयुआरएम/३०० दि. २/६/२००८ चे पत्र.
२) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भूजिं)/५५१ दि. २०/८/२००८ चे पत्र.
३) स्थायी समिती ठराव क्र. ९६७, दि. २/९/२००८.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७९ मध्ये आयुक्तांस महानगरपालिकेच्या मंजूरीने, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्ट्याने देता येईल, विकता येईल, भाड्याने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरित करता येईल अशी तरतूद आहे.

सबब पुणे महानगरपालिकेच्या ताब्यातील मालमत्ता बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर महानगरपालिकेच्या जागा विकसित करतेवेळेस तसेच मनपाच्या ईतर प्रकारच्या रिकाम्या व बांधलेल्या मुख्य सभेच्या मान्यतेने देण्यात येणाऱ्या जागा यांची भाडेपट्टा मुदत ९९ वर्षापर्यंत ठेवणेसाठी पुणे महानगरपालिकेस अनुमती देणेची शासनास मागणी करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र. २६०</u>**

संदर्भ :– १) श्री.विठ्ठल चंद्रकांत थोरपे यांचा दि. ९/७/२००८ चा अर्ज.
२) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भुजिं)/५८७ दि. २/९/२००८ चे पत्र.
३) स्थायी समिती ठराव क्र. १०१०, दि. १७/९/२००८.

---

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

धनकवडी २०/१ येथील पुणे–सातारा रोड रस्तारुंदीमध्ये बाधित होणारे अहिल्यादेवी मटनशॉपच्या जागेस पर्यायी जागा म्हणून धनकवडी स.नं. १९अ/४अ+ब येथील ट्रक टर्मिनन्सचे ले आऊटमधील ओटा नं. ७ व १५ (क्षेत्र प्रत्येकी ३६ चौ.मी.) फक्त गॅरेज व्यवसायासाठी किंवा त्यास अनुसरुन असणाऱ्या व्यवसायासाठी मा.नगर अभियंता निश्चित करतील ती प्रिमियमची रक्कम स्विकारुन नाममात्र वार्षिक भाडे आकारुन दिर्घ मुदतीचे भाडेपट्टा कराराने जागा देणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. २६१**

संदर्भ :- १) मा.संदिप लडकत, मा.अशोक येनपुरे, मा.सुनिल बनकर, मा.अनिल जाधव यांचे दि. १७/९/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. १०३२, दि. १७/९/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

विकेंद्रीकरण धोरणानुसार क्षेत्रिय कार्यालये व उपायुक्त कार्यालय स्तरावरुन जाहिरात देण्याचे कामकाज सुरु करण्यात आलेले असून जाहिरात वितरण, जाहिरात बिले व तदनुषंगिक कामात मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. तसेच १४ क्षेत्रिय कार्यालये स्तरावर शहराच्या विविध भागात मनपाचे होणारे विविध कार्यक्रम पाहणी दौरे, प्रोटोकॉल विषयक कामे, प्रसारमाध्यमांशी समन्वय या प्रमाणात मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली असल्याने व सर्व कामे ही कालमर्यादिची असल्याने ४ उपायुक्त कार्यालयात प्रत्येकी १ याप्रमाणे ४ सहाय्यक जनसंपर्क अधिकारी वर्ग–२ (शैक्षणिक पात्रता–कोणत्याही शाखेची पदवी, मान्यताप्राप्त विद्यापीठाची पत्रकारीता पदवी/पदविका व प्रोटोकॉल विषयक कामाचा अनुभव व संगणक पदवी/पदविका/संगणक साक्षर) पदे निर्माण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. २६२**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/जनेयो(क्र.२)/६२८ दि. १६/९/२००८ चे पत्र.

२) मा.अशोक येनपुरे, मा.महादेव बाबर, मा.सौ.ज्योत्स्ना सरदेशपांडे व मा.दिलिप उंबरकर यांची उपसूचना.

३) स्थायी समिती ठराव क्र. १०३९, दि. १७/९/२००८.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

महानगरपालिका हद्दीतील विशेष विकास कामे करण्यासाठी महानगरपालिकेची अंगीकृत कंपनी (स्पेशल परपज व्हेईकल) "PUNE INFRASTRUCTURE DEVELOPMENT CORPORATION" स्थापन करणेसाठी BPMC Act 1949 Section 66 (41A) नुसार शासनाची पुर्वमंजूरी आवश्यक असल्याने तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

स्पेशल परपज व्हेईकल अशी महानगरपालिकेची अंगीकृत कंपनीची सविस्तर योजना स्थायी समितीकडे मान्यतेसाठी पुन:सादर करावी.

**विषय क्र. २६३**

संदर्भ :- १) मा.संतोष आरडे यांचे दि. १२/९/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. १०४५, दि. २३/९/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. २० हॉटमिक्स प्लॅन्ट, येरवडामध्ये धोकादायक विद्युत पोल्स काढून अंडरग्राऊंड वायरिंग करणेकामी खालीलप्रमाणे र.रुपये २० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १५०, अ.क्र. ४६, शहरात विविध विकासाची कामे करणे, (यादी क्र. एस–९), पान क्र. २६१, अ.क्र. २, वॉर्ड क्र. ८ एकता सोसायटी स.नं. १० येथे विविध | | |

| | | |
|---|---|---|
| विकासाची कामे करणे | १० लाख | --- |
| पान क्र. २६१, अ.क्र. ३, वॉर्ड क्र. ८ हॉटमिक्स प्लॅन्ट येथील धोकादायक डोंगर उतारावर ग्लायडींग प्लास्टर करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. २० हॉटमिक्स प्लॅन्ट, येरवडामध्ये धोकादायक विद्युत पोल्स काढून अंडरग्राऊंड वायरिंग करणे | --- | २० लाख |

**<u>विषय क्र. २६४</u>**

संदर्भ :- १) मा.अनिल जाधव व मा.अरुण धिमधिमे यांचे दि. १६/९/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १०४६, दि. २३/९/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

श्री.अनिल बबनराव चिव्हे, बिगारी, ढोलेपाटील क्षेत्रिय कार्यालय, पाणीपुरवठा विभाग यांची नगरसचिव कार्यालयाकडे बिगारी म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र. २६५</u>**

संदर्भ :- १) मा.विजय देशमुख व मा.सागर माळकर यांचे दि. १६/९/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १०४७, दि. २३/९/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

हडपसर गाडीतळ येथील पथारी व हातगाडी पुनर्वसन करिता हडपसर गाडीतळ आगरवाल विश्रांतीगृहाजवळ, सोलापूर रोडवर कॅनॉलवर असलेल्या पुलापासून दक्षिण-उत्तर माळवाडीकडे जाणाऱ्या रोडलगत कॅनॉलमध्ये मोठी पाईप लाईन टाकून त्यावर स्लॅब टाकणेस व उजव्या बाजूस तुळशीबाग टाईप वॉर्ड क्र. ९२ व वॉर्ड क्र. ९३ मध्ये असलेल्या हातगाडी व पथारीवाले (अधिकृत व अनधिकृत) व्यवसायिकांचे पुनर्वसन करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

त्यामुळे सुशिक्षित बेकारांना रोजगार मिळेल व मनपाला उत्पन्नाचे साधन मिळेल. यापुर्वी दि. १०/१/२००३ रोजी नगरसचिव आ.क्र. ७५८७ ने ही जागा सुचित केलेली होती.

**<u>विषय क्र. २६६</u>**

संदर्भ :- १) मा.बाळासाहेब बोडके व मा.ज्ञानेश्वर शिंदे यांचे दि. १८/९/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १०४९, दि. २३/९/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र. ३६ मधील विद्युत पोल हलविणे व भुमिगतकेबल टाकणेकामी र.रुपये ८.५० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, | | |
| पान क्र. १४८, शहरातील रस्ते नियोजनाने डांबरी करणे, (यादी क्र. अे-२), | | |
| पान क्र. २५२, अ.क्र. ३७७, वॉर्ड क्र. ३६ मध्ये विविध ठिकाणी रस्ते करणे | ८.५० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ३६ मधील विद्युत पोल हलविणे व भुमिगतकेबल टाकणे | --- | ८.५० लाख |

<u>विषय क्र. २६७</u>

संदर्भ :- १) मा.अरविंद शिंदे व मा. सौ. कमल व्यवहारे यांचे दि. १८/९/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १०५०, दि. २३/९/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ४६ येथे विविध ठिकाणी नळकोंडाळे व त्यावर शेड बांधणेकरीता र.रुपये ३ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, अंदाजपत्रक अ व क मधील क्षेत्रिय कार्यालयाने भांडवली निधीतून करावयाची कामे, पान क्र. २१, वॉर्ड क्र. ४६, बरके आळी पाण्याची लाईन टाकणे | ३ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ४६ येथे विविध ठिकाणी नळकोंडाळे व त्यावर शेड बांधणे | --- | ३ लाख |

<u>विषय क्र. २६८</u>

संदर्भ :- १) मा.अरविंद शिंदे व सौ.कमल व्यवहारे यांचे दि. १८/९/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १०५१, दि. २३/९/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ४६ येथे विविध ठिकाणी विकास कामे करणे करीता र.रुपये ५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, अंदाजपत्रक अ व क मधील क्षेत्रिय कार्यालयाने नागरिकांच्या सहभाग योजनेअंतर्गत करावयाची कामे, भांडवली निधीतून क्षेत्रिय कार्यालयाने करावयाची कामे, पान क्र. १८, वॉर्ड क्र. ४६, आगाखान गल्ली येथे डांबरीकरण करणे | ५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ४६ येथे विविध ठिकाणी विकास कामे करणे | --- | ५ लाख |

<u>विषय क्र. २६९</u>

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(जिंघ)/से/६३३ दि. १६/९/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १०७१, दि. २३/९/२००८.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

श्री छत्रपती शिवाजी तंत्र माध्यमिक शिक्षण केंद्राकडील मुख्याध्यापक श्री.नंदकिशोर चंद्रकांत रहातेकर यांनी मनपा सेवेत प्रवेश करताना सादर केलेले जातीचे प्रमाणपत्र विभागीय जाती पडताळणी समिती, नागपूर यांनी अवैध ठरविले आहे. श्री.रहातेकर यांनी मनपा प्रशासनाची दिशाभूल केल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२)(ग) नुसार पुणे महानगरपालिकेच्या सेवेतून काढून टाकणेस **(Removel from Services)** मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

# शहर  सुधारणा समितीचे ठराव

**विषय क्र. २७०**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्रं.मअ–नअ–३९,दि.१०/४/२००६ चे पत्र.
२) मा.शाम देशपांडे, मा.सौ.रेखा टिंगरे, व मा.सौ.खेडेकर यांची दि.१५/५/२००६ ची उपसूचना.
३) शहर सुधारणा समिती ठराव क्र. ५५, दि. १५/५/२००६.
४) मनपा ठराव क्र. ८०, दि. २५/७/२००६.
५) मनपा ठराव क्र. ३५३, दि. २१/११/२००६.
६) मनपा ठराव क्र. १, दि. २३/४/२००७.
७) मनपा ठराव क्र. ९०, दि. ३०/७/२००७.
८) मनपा ठराव क्र. २५८, दि. २६/११/२००७.
९) मनपा ठराव क्र. ५९, दि. २१/५/२००८.

विषय :– पुणे पेठ हडपसर,मगरपट्टा,टाऊनशिप मधील पश्चिम हद्दीवरील एच. सी. एम. टी. आर. नं.२४ मी. डी.पी.रस्त्याच्या आखणीत अदलाबदल करणेबाबत.

–––

मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्र अवलोकन केले.

शहर सुधारणा समितीची शिफारस विचारात घेऊन –

पुणे शहरात एच.सी.एम.टी.आर.ची अलाईनमेंट बदलली तर अशा प्रकारची मागणी शहरातील अन्य विकसक सुध्दा करतील व असे करणे शहराच्या नियोजनाचे हिताचे नाही.

प्रशासनाने पुणे शहरातील एच.सी.एम.टी.आर. रोड अलाईटमेंट बाबत कोणतेही बदल सुचवू नयेत व सदरचे रस्ते अस्तीत्वातील नकाशाप्रमाणे ठेवण्यास मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २००८ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. २२१, दि. २३/९/२००८ चा झाला आहे.)

**विषय क्र. २७१**

संदर्भ :– १) मा. उज्वल केसकर व मा. दत्तात्रय खाडे यांचे दि. १८/४/२००७ चे पत्र.
२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. १४, दि. ९/५/२००७.
३) मा. महा.आयुक्त यांनी जा. क्र.मआ/नअ/१७७,दिनांक  १३/६/२००७ ने पाठविलेला अभिप्राय.
४) मा. अविनाश जाधव, उपाध्यक्ष, शहर सुधारणा समिती व मा. भिमराव तापकिर यांची दि. ६/७/२००७ ची उपसूचना.
५) शहर सुधारणा समिती ठराव क्रं.१०७,दि.६/७/२००७.
६) मनपा ठराव क्र. २६०, दि. २६/११/२००७.
७) मनपा ठराव क्र. ६०, दि. २१/५/२००८.

–––

मा.महा.आयुक्त यांचा अभिप्राय अवलोकन केला.

शहर सुधारणा समितीची शिफारस विचारात घेऊन –

मा.महा.आयुक्त यांचा अभिप्राय अंशत: मान्य करण्यात येत आहे. तसेच नियोजन प्राधिकारणाला राज्य सरकारच्या परवानगी R. P. मध्ये बदल करण्याचा अधिकार आहे. सबब पुणे मनपा हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांच्या प्रारुप विकास आराखड्यामध्ये राज्य सरकारच्या परवानगीने D. P. शी सुसंगत R. P. मध्ये बदल करण्यास मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २००८ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. २२२, दि. २३/९/२००८ चा झाला आहे.)

**<u>विषय क्रं. २७२</u>**

संदर्भ :– १) मा. मोहनसिंग राजपाल, मा. सौ. निर्मला हिरे यांचे दि. २७/१०/२००५ चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २७७, दि. २४/११/२००५.

३) मा.महा. आयुक्त यांनी क्रं. मआ/नअ/२९४, दि. ३१/७/२००७ ने पाठविलेला अभिप्राय.

४) शहर सुधारणा समिती ठराव क्र. ४७४, दि. ३१/३/२००८.

५) मनपा ठराव क्र. १११, दि. ९/६/२००८.

–––

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे पेठ येरवडा स. नं. १९१ येथील दिपक फर्टीलायझर्स व बंगला नं. ९ मध्ये कलम २०५ चा रस्ता आखणेबाबत दिपक फर्टीलायझर्स यांनी सदर रस्त्याच्या जागेची बाजार भावाने होणारी रक्कम भरण्यास तसेच रस्ता स्वखर्चाने तयार करण्यास लेखी संमती दर्शविलेली आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने स. नं. १९१ मधून कलम २०५ चा रस्ता आखणेसाठी जा. क्र. रेशा /२२/ १५६२०/०६, दि. १८/१२/२००६ अन्वये मान्यता दिलेली आहे.

तरी स. नं. १९१ व १९२ च्या पूर्वेकडील हद्दीवरील सिमाभिंतीलगत सुमारे १४५ मी. रुंदीचा व ९.० मी. रुंदीचा कलम २०५ चा रस्ता आखण्यास मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २००८ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. २२४, दि. २३/९/२००८ चा झाला आहे.)

**<u>विषय क्रं. २७३</u>**

संदर्भ :– १) पुणे महानगरपालिका मुख्य सभा ठराव क्र. ३११, दि. २३/१०/२०००.

२) रिटपिटीशन क्र. ६३१४/०५, दि. ६/२/२००७ बाबत ॲड श्री.आर.जी. केतकर यांचे पत्र.

३) मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/नअ/३६४,दि.२७/८/२००७ चे पत्र.

४) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ३३,दि. ६/५/२००८.

–––

मा. महा. आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे पेठ संगमवाडी टी. पी. स्कीम फा. प्लॉट नं. १३२ मे. न्यायालयाच्या आदेशानुसार जागेवरील रहिवाश्यांची संख्या विचारात घेऊन तसेच फा. प्लॉट १३२ मधील उर्वरित जागा दवाखान्यासाठी वापरली जात असल्याने ही बाब विचारात घेवून रहिवाश्यांना इतर ठिकाणी न हलविता आहे त्या ठिकाणी १०२०.५५ चौ. मी. क्षेत्राचा वापर आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकासाठी आरक्षित करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ९१ व ३७ अन्वये कार्यवाही करणेसाठी तसेच या कार्यवाहीचा भाग म्हणून दै. मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात व शासनाचे राजपत्रामध्ये जाहिर प्रकटन देवून नागरिकांच्या हरकती व सुचना मागविण्यासाठी मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २००८ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. २०३, दि. २३/९/२००८ चा झाला आहे.)

**<u>विषय क्र. २७४</u>**

संदर्भ :– १) मा.अशोक येनपुरे, मा.महादेव बाबर, मा. उज्वल केसकर, मा.अरूण धिमधिमे, मा.सौ. ज्योत्स्ना सरदेशपांडे, मा. वसंत मोरे, मा. अनिल जाधव यांचे दि. १६/९/२००८ चे पत्र.

२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. १४८, दि. १६/९/२००८.

–––

पुणे महानगरपालिकेने ३०/११/२००५ रोजी २३ गावांचा प्रारुप विकास आराखडा प्रसिध्द करुन एम. आर. टी. पी. ॲक्टचे कलम ३०(१) अन्वये ३१/१२/२००५ रोजी महाराष्ट्र शासनास सादर केला.

१३/८/२००८ रोजी राजपत्राद्वारे एम. आर. टी. पी. ॲक्ट २२(ए) अन्वये नागरिकांकडून हरकती/सूचना मागविल्या आहेत.

महापालिकेने प्रारुप विकास आराखडा महाराष्ट्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविताना आरक्षणामध्ये कोणतेही बदल करु नयेत असे स्पष्टपणे नमूद करुनही शासन स्तरावर युनिट क्र. १ बाणेर बालेवाडी मध्ये मोठ्या प्रमाणात बदल प्रस्तावित केल्याचे दिसून येत आहे.

पुणेकरांच्या हिताच्या दृष्टीने मुख्य सभेने तयार करुन पाठविलेल्या प्रारुप विकास आराखड्यात कोणतेही बदल करु नयेत. तसेच ज्या आरक्षणांमध्ये बदल केले आहेत ते रद्द करावेत.

महाराष्ट्र शासनाने या शासन निर्णयाद्वारे युनिट क्र. १ बाणेर बालेवाडी मोठ्या प्रमाणात बदल सुचविले आहेत. या बदलाबद्दल महापालिकेकडून शासनाने आरक्षणांमध्ये कोणतेही बदल करु नयेत अशी हरकत नोंदविण्यास मान्यता द्यावी,अशी मुख्य़सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. २७५**

संदर्भ :- १) मा.अति.महा.आयुक्त( वि ) यांचे जा. क्रं. मआ/उआ ( से )/५७९, दि.१/९/०८ चे पत्र.
२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. १४१, दि. १६/९/२००८.

---

मा. अति.महापालिका आयुक्त (वि) यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व शिफारस –

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील स्टेशन ड्युटी ऑफिसर ( वे.श्रे.रू.४३०० ते १००४५ + मान्य भत्ते ) या संवर्गातील रिक्त जागा भरणेसाठी खालीलप्रमाणे शिफारस केलेल्या निवडयादीस व निवड यादीवरील उमेदवारांची नेमणूक करणेस मुं.प्रां.म.न.पा.अधिनियम १९४९ मधील कलम ५३(१) प्रमाणे मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**निवडयादी.**

| अ.क्र. | सेवकाचे नाव | जातीचा गट | फायरमन पदावरील नेमणूक दिनांक |
|---|---|---|---|
| १) | श्री. शिवाजी बाजीराव मेमाणे | भज(क) | २७/१०/१९९९ |
| २) | श्री. समीर बशीर शेख | खुला | ४/१/२००१ |
| ३) | श्री.संजय भिमराव रामटेके | अजा | ६/१/२००१ |

**विषय क्र. २७६**

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्रं.मआ/उआ(जिं.घ)/से/४७८,दि.१/०८/०८ चे पत्र.
२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. १४६, दि. १६/९/२००८.

---

मा. महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व शिफारस –

पुणे मनपाच्या अभियांत्रिकी शाखेकडील कनिष्ठ अभियंता (सिव्हील/विद्युत/मेकॅनिकल ) या हुद्दयाच्या शेड्युलमान्य पदावर सुरूवातीस नेमणूका करताना त्या पदासाठी मनपाच्या मान्य धोरणानुसार एकवट वेतनाऐवजी मान्य असणा-या समय वेतनश्रेणीमध्ये ( रू. ५५०० ते ९००० + मान्य भत्ते ) नेमणूका करणेस मान्यता प्राप्त झाल्याने कनिष्ठ अभियंता (विद्युत ) या हुद्दयावरील रिक्त पदावर नेमणूका करण्यासाठी प्रशासनाने सुचित केलेल्या खालील प्रतिक्षायादीवरील उमेदवारांच्या उपलब्ध जागांवर या संवर्गातील आरक्षण व अनुशेष विचारात घेवून नेमणूका करणेस मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३ ( १ ) अन्वये मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**कनिष्ठ अभियंता ( विद्युत )**

**प्रतिक्षायादी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | जातीचा गट | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १) | श्री. गोहाड ओंकार सुर्यकांत | खुला | बी.ई.( इलेक्ट्रीकल ) |
| २) | श्री. जगताप प्रशांत अशोक | इमाव | बी.ई.( इलेक्ट्रीकल ) |
| ३) | श्रीमती ससाणे दिपा चंद्रकांत | इमाव | बी.ई.( इलेक्ट्रीकल ) |

**विषय क्र. २७७**

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्रं.मआ/उआ(जिं.घ)/से/४८०,दि.१/०८/०८ चे पत्र.

२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. १४७, दि. १६/९/२००८.

---

मा. महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व शिफारस -

पुणे महानगरपालिका प्रशासनाचे अभियांत्रिकी संवर्गात सहाय्यक अभियंता या निवडयादीतील दुय्यम अभियंता (सिव्हिल ) ( वे.श्रे.रू. ६५०० ते १४७५० + मान्य भत्ते ) या संवर्गातील सेवकांच्या सहाय्यक अभियंता (सिव्हील ) ( वे.श्रे.रू. ६५०० ते १०५०० + मान्य भत्ते )या संवर्गातील रिक्त जागांवर रोस्टर नियमावलीनुसार व मनपा सेवाविनियम प्रकरण १४ मधील प्रमाणानुसार रिक्त पदावर नेमणूका करणेस मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१ ) अन्वये मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**सहाय्यक अभियंता ( सिव्हील ) उमेदवारांची निवडयादी.**

| अ.क्र. | सेवकाचे नाव | जातीचा गट | शैक्षणिक पात्रता | कनिष्ठ अभियंता पदावरील नेमणूक दिनांक | दुय्यम अभियंता पदावरील नेमणूक दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १) | श्री.चव्हाण सुधीर मारूती | विजा (अ) | बी.ई.(सि) | १६.२.२००० | १०.४.२००८ |
| २) | श्री.धायगुडे प्रताप तात्याबा | भज(क) | डी.सी.ई. | १६.९.२००० | १०.४.२००८ |

**महिला बाल कल्याण समितीचा ठराव**

**विषय क्र. २७८**

संदर्भ :- १) मा. अति. महा. आयुक्त (वि) यांचे जा. क्र. मआ/उआ(जिंघ)/एचओ/५२८, दि.८/८/०८चे पत्र.

२) मा. महिला बाल कल्याण समिती ठराव क्र. ७३, दिनांक २४/९/२००८.

---

मा.अति.महा.आयुक्त ( वि ) यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व शिफारस-

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याकडे थिएटर अटेंन्डट ( समय वेतन श्रेणी रू. २५५० ते ३२०० + मान्य भत्ते ) या वर्ग - ४ च्या हुद्दयाचे रिक्त पद भरणेसाठी, खालीलप्रमाणे शिफारस केलेल्या निवडयादी व प्रतिक्षायादी वरील उमेदवारांची सदर पदाच्या जागा उपलब्धतेनुसार व आस्थापना विषयक बाबींचा विचार करून नेमणूक करणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५३ ( १ ) अन्वये मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

खालील प्रतिक्षायादी, निवडयादीवरील उमेदवार रूजू होईपर्यन्त किंवा एक वर्षाचा कालावधी यापैंकी जे अगोदर घडेल तोपर्यन्त अस्तित्वात राहील.

**- खुला प्रवर्ग निवडयादी -**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १) | श्री. गणेश ज्ञानोबा घोलप |

**– खुला प्रवर्ग प्रतिक्षायादी –**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १) | श्री. शरद शंकर पवार |

**मा. महा. आयुक्त यांचे पत्र**

**विषय क्रं. २७९**

पुणे मनपा प्रशासनाकडे ''सहाय्यक संचालक, नगररचना'' या पदावर श्री. सु. रा. किणी यांची महाराष्ट्र शासन निर्णय क्र. टीपीव्ही–१२०३/२३५४/प्र.क्र.२८६/०३/नवि–२७, दि.२/८/२००८ रोजी बदलीने प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली असून ते दिनांक ८/८/२००८ रोजी मध्यान्हपूर्व रुजू झाले असून त्यांनी प्रत्यक्ष काम पुणे व पिंपरी–चिंचवड झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे करावयाचे असलेबाबत मा. महा. आयुक्त यांचे जावक क्र. मआ/उआ जिंघ/से/६४७, दि. १८/९/२००८ चे पत्र.

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :– ७/१०/२००८.

**शरद समेळ,**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :–१८ /१०/२००८

**–: परिपत्र :–**

**पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्रं. १ (के) अन्वये शुक्रवार दि. १७/१०/२००८ रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता भरलेल्या माहे ऑक्टोबर २००८ या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यात आलेले विषय.**

**विषय क्रं. २८०**

संदर्भ :– १) मा.शैलेश चरवड व मा.बाळासाहेब कापरे यांचे दि. १९/९/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ११०१, दि. ६/१०/२००८.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

स.नं. १४ समर्थनगर हिंगणे खुर्द येथील कोठावळे यांच्या गिरणीपासून कॉलेज रोडपर्यंत एल टाईप रस्ता विकसित करणेसाठी र.रुपये ८ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १५०, अ.क्र. ४७, शहरातील विविध ठिकाणी रस्ते डांबरी करणे, (यादी क्र. एस–१०), पान क्र. २६९, अ.क्र. ३७०, वॉर्ड क्र. १३१ स.नं. ३९, माणिकबाग इंडस्ट्रीयल इस्टेट येथील अंतर्गत रस्ते ग्राऊट व पेव्हर करणे. | ८ लाख | ––– |
| नविन सुचविलेले काम<br>स.नं. १४ समर्थनगर हिंगणे खुर्द येथील कोठावळे यांच्या गिरणीपासून कॉलेज रोडपर्यंत एल टाईप रस्ता विकसित करणे. | ––– | ८ लाख |

**विषय क्रं. २८१**

संदर्भ :– १) मा.शैलेश चरवड व मा.बाळासाहेब कापरे यांचे दि. १९/९/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ११०२, दि. ६/१०/२००८.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

स.नं. ३५/१५ रामनगर वसाहत येथील कमी व्यासाच्या ड्रेनेज लाईन बदलणे व दुरुस्त करणेसाठी र.रुपये २ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, क.अंदाजपत्रक, २.गटारे व नाले, पान क्र. ३०, अ.क्र. २, मुख्य मलनि:सारणी, मुख्य तपासकुंड (मॅनहोल्स) उपमुख्य मलनि:सारण नलिका, मलनि:सारणीसंबंधी ईंर कामे स्थापत्य कामे व साधनसामुग्री, (अ) शहराच्या मध्यवर्ती भागाच्या विकासासाठी ड्रेनेज लाईन टाकणे, (यादी क्र. एस–६), पान क्र. ५४, अ.क्र. ११९, वॉर्ड क्र. १३१ स.नं. ३९, माणिकबाग | | |

| | | |
|---|---|---|
| इंडस्ट्रीयल इस्टेट येथील अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे | २ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| स.नं. ३५/१५ रामनगर वसाहत येथील कमी व्यासाच्या ड्रेनेज लाईन बदलणे व दुरुस्त करुन देणे | --- | २ लाख |

**विषय क्रं. २८२**

संदर्भ :- १) मा.शैलेश चरवड व मा.बाळासाहेब कापरे यांचे दि. १९/९/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ११०३, दि. ६/१०/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

स.नं. ३५ येथील रामनगर ओढ्यात उर्वरित चेनलिंक व फेन्सिंग/रिटेनिंग वॉल करणेसाठी र.रुपये ४ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, क.अंदाजपत्रक, २.गटारे व नाले, पान क्र. ३०, अ.क्र. २, मुख्य मलनि:सारणी, मुख्य तपासकुंड (मॅनहोल्स) उपमुख्य मलनि:सारण नलिका, मलनि:सारणीसंबंधी इतर कामे स्थापत्य कामे व साधनसामुग्री, (ड) शहरातील नागझरी नाले सुधारण्यासाठी, (यादी क्र. एस-१३), पान क्र. ५६, अ.क्र. २१, वॉर्ड क्र. १३१ स.नं. ३५ रामनगर व मिनाक्षीपुरम, सिंहगड कॉलेज रोड येथील नाल्यास नदी सुधारणा योजनेअंतर्गत रिटेनिंग वॉल व चेनलिंक फेन्सिंग करणे | ४ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| स.नं. ३५ येथील रामनगर ओढ्यात उर्वरित चेनलिंक व फेन्सिंग/रिटेनिंग वॉल करणे | --- | ४ लाख |

**विषय क्रं. २८३**

संदर्भ :- १) मा.सौ.दिपाली धुमाळ व मा.सौ.अश्विनी कदम यांचे दि. २२/९/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ११०५, दि. ६/१०/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र. १०९ स.नं. ११८ मध्ये शाळेचे आरक्षण आहे. सदर ठिकाणी शाळा बांधणेसाठी र.रुपये ७ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, १९.भाजी मंड्या व पशुवधगृहे, पान क्र. २०६, अ.क्र. १७, शहरातील विविध भाजी मंड्यांमध्ये विकास कामे करणे, (यादी क्र. एस-२९), पान क्र. २९६, अ.क्र. ११, वॉर्ड क्र. १०९, स.नं. ११९ मध्ये पुणे मनपाच्या जागेमध्ये ओढा मार्केटचे आरक्षण आहे. सदर ठिकाणी ओढा मार्केट बांधणे | ७ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. १०९ स.नं. ११८ मध्ये शाळेचे आरक्षण आहे. सदर ठिकाणी शाळा बांधणे | --- | ७ लाख |

**विषय क्रं. २८४**

संदर्भ :- १) मा.बापुसाहेब पठारे व मा.सौ.सुमन पठारे यांचे दि. २३/९/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ११०८, दि. ६/१०/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ९ खराडी, स.नं. ३७, विडी कामगार वसाहत येथे ताब्यात असलेल्या जागेवर मागासवर्गीयांसाठी समाजमंदिर बांधणेसाठी र.रुपये १७ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १८६, अ.क्र. १३४, भवन विभागाअंतर्गत विविध विकासाची कामे करणे, (यादी क्र. जे-१०), पान क्र. २८९, अ.क्र. ७, वॉर्ड क्र. ८, खराडी गाव येथे सांस्कृतिक हॉल बांधणे. | ८.५० लाख | --- |
| पान क्र. १८०, अ.क्र. ३५,, शहरात विविध ठिकाणी व्यायामशाळा बांधणे, (यादी जे-९), पान क्र. २९०, अ.क्र. ५, वॉर्ड क्र. ८ खराडी गावठाण येथे पोहोण्याचा तलाव व व्यायामशाळा बांधणे. | ८.५० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ९ खराडी, स.नं. ३७, विडी कामगार वसाहत येथे ताब्यात असलेल्या जागेवर मागासवर्गीयांसाठी समाजमंदिर बांधणे. | --- | १७ लाख |

**विषय क्रं. २८५**

संदर्भ :- १) मा.सुरेखा साळुंके व मा.दिपक बोडके यांचे दि. २५/९/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ११०९, दि. ६/१०/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. २३ मधील नरवीर तानाजी वाडी येथील विविध कामे करणेसाठी र.रुपये ४२.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १४८, अ.क्र. २, शहरातील रस्ते नियोजनाने डांबरी करणे, (यादी क्र. ए-२), पान क्र. २४९, अ.क्र. २४३, गणेशखिंड रस्ता शेतकी कॉलेज ते साखर संकुल वाकडेवाडी या रस्त्यावर सायकल ट्रॅक व पदपथ करणे. | ४२.५० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| १) वॉर्ड क्र. २३ मध्ये वीर नेताजीवाडी समोरील नाला कॉंक्रीटींग करणे. | --- | १० लाख |
| २) वॉर्ड क्र. २३ येथे २ ठिकाणी नविन शौचालय बांधणे. | --- | ६.५० लाख |
| ३) वॉर्ड क्र. २३ मध्ये विरंगुळा केंद्र बांधणे. | --- | १० लाख |
| ४) वॉर्ड क्र. २३ मधील मनपा शाळा क्र. ५३ नविन बांधणे. | --- | १६ लाख |

**विषय क्रं. २८६**

संदर्भ :- १) मा.सौ.दिपाली धुमाळ व मा.संदिप लडकत यांचे दि. १७/९/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ११२६, दि. ६/१०/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

नागरी विकास प्रतिष्ठान, वारजेच्या वतीने नवरात्र महोत्सव दि. ४ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर २००८ विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केलेले आहेत. तरी या कार्यक्रमासाठी पुणे महानगरपालिकेतर्फे र.रुपये २ लाख देवून प्रायोजकत्व स्विकारण्यांस मान्यता द्यावी अशी मा.मुख्यसभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं. २८७**

संदर्भ :– १) पुणे डिस्ट्रीक्ट खो–खो असोसिएशन यांचे दि.११/७/२००८ चे पत्र.
२) मा.महापौर यांचे जा.क्रं. २७८०,दि.२७/८/२००८ चे पत्र.
३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/उआ(ज)/६६६, दि.२३/९/२००८ चे पत्र.
४) स्थायी समिती ठराव क्र. ११३४, दि. ६/१०/२००८.

–––

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

पुणे महापौर चषक अखिल भारतीय खो–खो स्पर्धा २००७–०८ करीता मा.महापौर यांनी शिफारस केल्यानुसार व प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चानुसार पं.नेहरु स्टेडियम विभागाकडील खालील नमूद केलेल्या अर्थशिर्षकामधून पुणे डिस्ट्रीक्ट खो–खो असोसिएशनला र.रुपये १४,३०,०००/– (रक्कम रुपये चौदा लाख तीस हजार फक्त) आदा करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अंदाजपत्रक वर्ष सन २००८–०९ (आरई २७अे११५), १७–खेळ व क्रिडांगणे, क–पं.नेहरु स्टेडियम, १३–महापौर चषक खो–खो, उपलब्ध र.रुपये १४,३०,०००/–

(मा. मुख्य सभेची मान्यता मिळेल या भरवश्यावर कार्यवाही करणेस)

**विषय क्रं. २८८**

संदर्भ :– १) मा.सौ. सुलोचना तुपे यांचे दि. २९/९/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ११४३, दि. ६/१०/२००८.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं.९३, हडपसर, स.नं.१६५ पाण्याच्या हौदाजवळ १० सिट्चे सुलभ शौचालय बांधींकरिता र.रू.८ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, ४ गवनि निूीतून करावयाची कामे पान क्रं.२३२ अ.क्रं. ५ सुलभ पध्दतीची शौचालये बांधणे , (यादी क्रं.एस–१९) पान क्र. ३०४, अ.क्र. २९, वॉर्ड क्रं.९३ साने गुरूजी हॉस्पिटल पाठिमागील झोपडपट्टीमधील १० सिट्सचे सुलभ शौचालय बांधणे. | ४ लाख | ––– |
| पान क्रं.३०४ अ.क्रं.३०, वॉर्ड क्रं.९३ कदम झोपडपट्टीत जकात नाक्यासमोर १० सिट्चे सुलभ शौचालय बांधणे. | ४ लाख | ––– |
| नविन सुचविलेले काम वॉर्ड क्रं.९३, हडपसर स.नं.१६५, पाण्याच्या हौदाजवळ १० सिट्चे सुलभ शौचालय बांधणे. | ––– | ८ लाख |

**विषय क्रं. २८९**

संदर्भ :– १) मा.विकास दांगट व मा. सागर माळकर यांचे दि.१/१०/०८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ११५४, दि. ६/१०/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉ.क्रं.१३० मध्ये एच.टी.आणि एल.टी.विद्युत केबल अंडरग्राऊड करणेकरिता रू.३०,००,०००/–(तीस लाखाचे) खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक १९ भाजी मंड्या व पशुवधगृहे, पान क्रं.२०६,अ.क्रं. १७ शहरातील विविध भाजी मंड्यामध्ये विकास कामे करणे. (यादी क्रं.एस–२९), पान क्रं.२९६ अ.क्रं.१३, वॉ.क्रं.१३० ॲमिनेटीज् स्पेसवर भाजी मंडई बांधणे / नियोजित डी.पी.मधील भाजी मंडई किंवा ॲमिनीटी | ३० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉ.क्रं.१३० मध्ये एच.टी.आणि एल.टी.विद्युत केबल अंडरग्राऊड करणे | --- | ३० लाख |

**विषय क्रं. २९०**

संदर्भ :– १) मा. विशाल तांबे व मा.दत्तात्रय धनकवडे यांचे दि.१/१०/०८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ११५५, दि. ६/१०/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉ.क्रं.१३५, राऊत बाग येथील सोसायटी मागील नाला चॅनेलायझेशन करणेकरिता २५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक क अंदाजपत्रक, २ गटारे व नाले , पान क्रं.३० अ.क्रं.२ मुख्य मलनि:सारणी, मुख्य तपासकुंड (मॅनहोल्स) उपमुख्य मलनि:सारण नलिका, मलनि:सारणीसंबंधी इतर कामे स्थापत्य कामे व साधनसामुग्री, (अ) शहराच्या मध्यवर्ती भागाच्या विकासासाठी ड्रेनेज लाईन टाकणे, (यादी क्रं.डी–१ बी), पान क्रं.५० अ. क्रं ४०, वॉर्ड क्रं.१३५ उर्मिला सोसायटी स.नं. २८ व २९ येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | २५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉ.क्रं.१३५, राऊत बाग येथील सोसायटी मागील नाला चॅनेलायझेशन करणे. | --- | २५ लाख |

**विषय क्रं. २९१**

संदर्भ :– १) मा.सौ.मंगला मंत्री , मा.सौ.ज्योत्स्ना सरदेशपांडे यांचे दि. ६/१०/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ११६१, दि. ६/१०/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉ.क्रं.४५ (विकासनगर घोरपडी) या भागातील अंतर्गत रस्ते ग्राउट /कॉंक्रीट /डांबरीकरण

करणेकरिता र.रु.२१,२५,०००/- लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, १० पथ -१० क पथ सुधारणा पान क्रं.१४८ अ.क्रं.२,शहरातील रस्ते नियोजनाने डांबरीकरण करणे.(यादी क्रं.ए-२),पान क्रं.२४५,अ.क्रं.६३, वॉर्ड क्रं. ४५ सोपानबाग मनपा शौंचालय ते मुदलीयार रस्ता येथे ग्राउट व डांबरीकरणकरणे. | २१,२५,०००/- | --- |
| नविन सुचविलेले काम वॉ.क्रं.४५ (विकासनगर घोरपडी) या भागातील अंतर्गत रस्ते ग्राउट /कॉंक्रीट /डांबरीकरण करणे. | --- | २१,२५,०००/- |

**विषय क्रं. २९२**

संदर्भ :- १) मा.सौ.मंगला मंत्री , मा.सौ.ज्योत्स्ना सरदेशपांडे यांचे दि.६/१०/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ११६२, दि. ६/१०/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉ.क्रं.४५ (विकासनगर घोरपडी) या भागातील विद्युततारा भूमीगत करणेकरिता र.रू.१७,००,०००/- लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, १० पथ -१० क पथ सुधारणा पान क्रं.१४८ अ.क्रं.२,शहरातील रस्ते नियोजनाने डांबरीकरण करणे. (यादी क्रं.ए-२), पान क्रं.२४५, अ. क्रं. ८२, वॉर्ड क्रं. ४५ स.नं.६४ एम्प्रेस गार्डन नाल्यालगत ॲप्रोच रस्त्याकरिता आर.सी.सी.रेटनिंग वॉल बांधणे व रस्ता तयार करणे. मुदलीयार रस्ता येथे ग्राउट व डांबरीकरणकरणे. | १७,००,०००/- | --- |
| नविन सुचविलेले काम वॉ.क्रं.४५ (विकासनगर घोरपडी)या भागातील विद्युततारा भूमीगत करणे. | --- | १७,००,०००/- |

**विषय क्रं. २९३**

संदर्भ :- १) मा.विशाल तांबे यांचे दि.४.१०.०८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ११६३, दि. ६/१०/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉ.क्रं.१३५ मध्ये विविध ठिकाणी सी.आय.पाण्याच्या लाईन टाकणेकरणे करिता र.रु.२१,७५,०००/- लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक,क अंदाजपत्रक, २ गटारे व नाले,पान क्रं.३० अ.क्रं.२,मुख्य मलनि:सारणी,मुख्य तपासकुंड(मॅनहोल्स)उपमुख्यमलनि:सारण नलिका,मलनि:सारणीसंबंधी इतर कामे स्थापत्य कामे व साधनसामुग्री (अ) शहराच्या मध्यवर्ती भागाच्या विकासासाठी ड्रेनेज लाईन टाकणे,(यादी क्रं.डी–१ बी),पान क्रं.५० अ.क्रं.४०, वॉ.क्रं.१३५ उर्मिला सोसायटी स.नं.२८व स.नं.२९ येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | २१,७५,०००/– | --- |
| नविन सुचविलेले काम वॉ.क्रं.१३५ मध्ये विविध ठिकाणी पाण्याच्या सी.आय.लाईन टाकणे. | --- | २१,७५,०००/– |

**विषय क्रं. २९४**

संदर्भ :– १) मा.प्रकाश लक्ष्मण गलांडे पाटील यांचे दि. ०४/१०/०८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ११६४, दि. ६/१०/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

कल्याणीनगर मधील दामोदर रावजी गलांडे पाटील उद्यानामध्ये विरंगुळा केंद्र बांधणे व सुधारणा कामे करण्यासाठी खालीलप्रमाणे रक्कम रू. ४ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक १६ उद्याने प्राणीसंग्रहालये पान क्रं.१९६ अ.क्रं.९१,शहरातील विविध उद्यानामध्ये विविध विकास कामे करणे. (यादी एस –२७) पान क्रं.२९४, अ.क्रं.३, वॉर्ड क्रं.१३ कल्याणीनगर मधील दामोदर रावजी गलांडे पाटील उद्यानामध्ये जेन्टस् व लेडीज जीम व चिडीयाघर करणे. | ४,००,०००/– | --- |
| नविन सुचविलेले काम कल्याणीनगर मधील दामोदर रावजी गलांडेपाटील उद्यानामध्ये विरंगुळा केंद्र बांधणे व सुधारणा कामे करणे. | --- | ४,००,०००/– |

**विषय क्रं. २९५**

संदर्भ :– १) मा.दिलीप उंबरकर व मा.सौ.ज्योत्स्ना सरदेशपांडे यांचे दि. ६/१०/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ११६५, दि. ६/१०/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

कर्वेनगर सेवा संस्था नवरात्र महोत्सवासाठी र.रुपये ५,००,०००/– (पाच लाख) देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्यसभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं. २९६**

संदर्भ :– १) मा.विरेंद्र किराड, मा.संदिप लडकत, मा.अशोक येनपुरे यांचे दि. ६/१०/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ११६७, दि. ६/१०/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे म.न.पा.चे नगरसचिव कार्यालयाचे संर्किण या शिर्षकातून सर्व पक्षनेते यांचे कार्यालयातील चहापान खर्चास प्रत्येकी र.रू.५०,०००/– वर्षाला देण्यास धोरणात्मक मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं. २९७**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/उआ (क्र१) घनकचरा /६८२,दि.६/१०/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ११६८, दि. ६/१०/२००८.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

उरूळी देवाची सर्व्हे नं. ३०,३१ व ३२ व फुरसुंगी येथील सर्वे नं. १९१ ते १९५ येथील कचरा डेपोच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिका हद्दीबाहेर विविध विकास कामे करण्यासाठी व सदर कामासाठी वर्गीकरणाने आर्थिक तरतूद रू. १० कोटी उपलब्ध करण्यासाठी खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) महानगर पालिकेची आवश्यक कर्तव्ये विचारात घेता तसेच उरूळी देवाची व फुरसुंगी येथिल कचरा डेपोमुळे सदर परिसरामध्ये मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेली सर्व कामे पूर्ण करण्यासाठी सन २००८ – ०९ च्या अर्थसंकल्पामध्ये विशेष विकास निधी या नविन सदरी रू.१० कोटी एवढी रक्कम ज्या विभागाशी संबंधित काम पार पाडावयाचे आहे अशा विभागाकडील भांडवली कामांसाठी उपलब्ध तरतूदीमधून तसेच राष्ट्रकुल युवा स्पर्धेच्या अर्थशिर्षका खालील उर्वरित शिल्लक रक्कम वर्ग करणेस.

२) सदरचा खर्च हा मनपा हद्दीबाहेर होणार असल्याने कामाची आवश्यकता व निकड लक्षात घेता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ८९ अंतर्गत सदर विकास कामांसाठी होणा–या खर्चास मान्यता मिळणेस.

३) कामाची तातडी विचारात घेता मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर वर्गीकरणास व काम चालू करण्यास मान्यता मिळणेस.

**विषय क्रं. २९८**

संदर्भ :– १) मा.महानगरपालिका ठराव क्र. १७४ दि. २३/१०/२००७ व महाराष्ट्र शासन राजपत्र माहे दि. ६ मार्च २००८ तील भाग क्र. १०.

२) मा.उपमहापौर श्री.चंद्रकांत बलभीम मोकाटे यांचे दि. ३१/७/२००८ रोजीची पत्रे.

३) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उरा(क्र.१)/७०३ दि. १३/१०/२००८ चे पत्र.

४) स्थायी समिती ठराव क्र. ११६९, दि. १३/१०/२००८.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

वॉर्ड क्र. ६४ कोथरुड येथील कै.तात्यासाहेब थोरात उद्यानालगत असलेले अंदाजे ६१.८४ चौ.मी. व ७०.५६ चौ.मी. क्षेत्रफळाचे दोन हॉल अव्यवसायिक/समाज उपयोगी संस्थांना व्यवस्थापन व चालविणेस देणेसाठी रितसर जाहिरात देवून सेवाभावी संस्थांकडून प्रस्ताव मागविले असता एकूण ४ संस्थांचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

सदर प्रस्तावांची छाननी केली असता नियम व अटीत नमूद केल्याप्रमाणे प्रबोधन विचारधारा या संस्थेने ५ वर्षाचा ऑडीट रिपोर्ट, सामाजिक कार्यालयाचा अहवाल वृत्तांत दिला आहे. इतर तीन संस्थांनी या

अटी पूर्ण केलेल्या नाहीत.

तरी प्रस्तुत प्रकरणी प्रबोधन विचारधारा, ६०५ शनिवार पेठ, पुणे ३० या संस्थेस वॉर्ड क्र. ६४ कोथरुड येथील कै.तात्यासाहेब थोरात उद्यानालगत असलेले दोन हॉल त्यांचेकडून महापालिकेच्या नावाची रुपये १ लाख रकमेची बँक गॅरेंटी घेवून व याबाबतच्या शर्ती, अटी विधी सल्लागार यांचेकडून निश्चित करुन घेवून त्यांना विनामोबदला सन २००८–०९ पासून पुढील पाच वर्षाकरीता चालविण्यास देण्यास व त्याप्रमाणे त्यांचेशी करार करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– विषय क्र. २९८ हा दि. १७/१०/२००८ च्या मनपा मुख्य सभेत प्राधान्याने मान्य झाला आहे.)

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**